प्रेसनोट दि. १०/०३/२०२२

नवी मुंबई महानगरपालीका, दिघा प्रभाग समिती एच वार्डचे वरिष्ठ लिपीक राजेश सखाराम राउत यांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | रबाळे एमआयडीसी पो.स्टे |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | श्री. राजेश सखाराम राउत, वय ५२ वर्षे, वरिष्ठ लिपीक, नवी मुंबई महानगरपालीका, दिघा प्रभाग समिती एच वार्ड |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ७०००/–रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | चार दिवसापुर्वी २०००/–रू. स्विकारली आहे. व आज दिनांक १०/०३/२०२२ रोजी तडजोडीअंती ३०००/–रू. लाचेची रक्कम स्विकारली असे एकुण ५०००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार यांना चायनीज फुड हातगाडी मुकुंद नाका दिघा येथे लावणेसाठी लोकसेवक यांनी ७०००/–रू. लाचेची मागणी केली असुन पैकी २०००/– रू. चार दिवसापुर्वी स्विकारून त्यानंतर उर्वरीत ५०००/–रू. लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे दि. ०९/०३/२०२२ रोजी तक्रार नोंदवली होती.<br>तकारदार यांनी दिलेल्या तकारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/०३/२०२२ रोजी पडताळणी केली असता नमूद लोकसेवक यांनी चार दिवसापुर्वी २०००/–रू. स्विकारल्याचे मान्य करून उरलेली ५०००/–रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३०००/–रू. लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे नि पन्न झाल्यावरून अेसीबी ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून लोकसेवक . राजेश सखाराम राउत, वरिष्ठ लिपीक, नवी मुंबई महानगरपालीका, दिघा प्रभाग समिती एच वार्ड यांना तकारदार यांचेकडून ३०००/–रू. लाचेच्या रक्कमेचा स्विकार केल्यानंतर दिनांक १०/०३/२०२२ रोजी ११:३५ वा. नवी मुंबई महानगरपालीका, दिघा प्रभाग समिती एच वार्ड कार्यालयातील रूम नं. ३८ येथे रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी– मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले सो, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(सुषमा पाटील)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे